औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या शुक्रवार दिनांक २१. ९. ९० रोजी दुपारी ३.०० वा. झालेल्या ५४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१. मा. श्री. ईश्वर भोसीकर — सभापती/औ. मं
२. मा. श्री. अ. म. महाजन — उपसभापती/औ. मं
३. मा. श्री. गिरीश गोखले, विभागीय आयुक्त, नासिक विभाग, नासिक. — सदस्य
४. मा. श्री. मुन्शीलाल गौतम, आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद. — सदस्य

मा. आयुक्त औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, प्रशासक म. न. पा नासिक व उपसंचालक नगररचना औरंगाबाद हे पूर्व सुचनेनुसार अनुपस्थीत होते.

विषय क्र. १: दिनांक ३०. ८. ९० रोजी झालेल्या ५३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मंडळाच्या ५३ व्या बैठकीत विषय क्र. ९ ठराव क्र. ३०० वर चर्चा करतांना मा. आयुक्त नासिक हयांनी विचारणा केली की, सदरचा अपहार वेळीच लक्षात का आला नाही. त्यावर मुख्य लेखा अधिकारी/औ. मं यांनी मंडळाच्या सदस्यांना माहिती दिली की, औरंगाबाद मंडळाची स्थापना दिनांक ५. १२. ७७ रोजी झाली. दि. ५. १२. ७७ पासून गाळयांच्या व भूखंडाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत गेली परंतु कर्मचारीवृंदात मात्र वाढ झाली नाही. स्टॅफिंग पॅटर्नमध्ये मंजूर केलेली पदे ही, वर्षानुवर्षे रिक्त होती. यात महत्वाचे म्हणजे मंडळाच्या स्थापनेनंतर फार उशीरा म्हणजे सन १९८१. ८२ नंतर लेखापालाची ४ पदे मंजूर करण्यांत आली. त्यापूर्वी लेखापालाचे फक्त १ पद होते. १९८१. ८२ मध्ये निर्माण करण्यांत आलेल्या ४ पदापैकी दोन पदे प्रतिनियुक्तीने भरण्यांत आली होती. परंतु १९८२ मध्ये सदर कर्मचारी त्यांच्या मुळ खात्याकडे परत गेले. सन १९८२ पासून ते सन १९८७ पर्यन्त मंडळात एकच लेखापाल काम करित होते. या मंडळात लेखाधिकारी

...

हे पद होते व या पदावर काही काळ लेखाधिकारी म्हणून अधिका-यांनी काम केले आहे. परंतु सदर पद सन १९८७-८८ मध्ये प्राधिकरणाने आपल्याकडे वर्ग करुन घेतले. त्यामुळे देखील कामावर बराच परिणाम झाला. मिळकत व्यवस्थापन विभागासाठी दोन सहाय्यक मिळकत व्यवस्थापकाचे पदे मंजूर असतांना दि. १६,७.९० पावेतो फक्त एकच पद भरण्यात आले. त्यामुळे मनुष्यबळा अभावी कार्यालयीन कामावर फार परिणाम झालेला आहे.

तसेच या मंडळातील ६ वरिष्ठ लिपिकाचे पदे रिक्त आहेत ते भरण्यासाठी वेळोवेळी प्राधिकरणास विनंत्या केलेल्या आहेत. ह्याशिवाय रोखपालाचे व ऑडीटरचे पद भरलेले नाही. त्यामुळे एकुण ८ वरिष्ठ लिपिकांची कार्यालयीन दैनंदिन कामे करुन घेण्यास उचित भासत आहे.

मंडळाच्या स्थापनेनंतर ८६-८७ पर्यन्त लेखा विभागातील व मिळकत व्यवस्थापन विभागातील लेख्यांशी संबंधीत कर्मचारी वर्ग अपूरा असल्यामुळे रोखवही व बँकेच्या लेख्यांशी ताळमेळ करण्याचे काम प्रलंबीत राहीले. सन १९८७ मध्ये लेखापालाची सर्व रिक्त पदे भरण्यांत आली. परंतु वरील प्रमाणे कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने खात्याच्या रोखवहीशी बँकेच्या लेख्याचा ताळमेळ घालण्याचे काम शक्य झाले नाही. प्राधिकरणास वेळोवेळी विनंती करुन प्राधिकरणाने रोखवहीशी बँकेच्या लेख्याशी ताळमेळ घालण्याचे काम सेवा निवृत्त लेखाधिकारी ह्याचेकडून कंत्राटीपध्दतीने करुन घेणेस परवानगी दिली. त्याप्रमाणे फेब्रुवारी ९० पावेतो ताळमेळाचे काम पूर्ण करुन घेणेत आले. कर्मचारीवृंद अपूरा असला तरी त्याचेकडून मार्च ९० ते जुलै ९० पावेतोचे ताळमेळाचे काम पूर्ण करुन घेणेत आले आहे.

या सर्व परिस्थीचा विचार करुन विभागीय आयुक्त नाशिक व मंडळाचे सदस्य यांनी आपी प्रतिक्रिया व्यक्त केली की, सातपूर नाशिक येथील मंडळाच्या गाळ्यांच्या हप्त्यापोटी वसुल केलेल्या रकमेचा अपहार केवळ पुरेसा कर्मचारीवृंद लेख्याचे ताळमेळ घालण्यास न नेमल्यामुळे झालेला आहे. असा अपहार पुन्हा होऊ नये म्हणून नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

ठराव क्र. ३०१

दिनांक ३०.८.९० रोजी झालेल्या ५३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतवर सविस्तर चर्चा होऊन ५३ व्या — बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: महाराष्ट्रात विपुल प्रमाणात घरबांधणी करण्यासाठी व उत्तम दर्जाचे बांधकाम करता यावे यासाठी तद्‌भय गरजा भागविण्यासाठी नव्या धोरणाचा शोध . . .
शासन निर्णय क्र. एचएसजी ३०८४/[६४]/का. ६
दिनांक ११ डिसेंबर १९८४ . . . मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांना काम देऊ करणे बाबत आणि
सिपोरेक्स इंडिया लिमिटेडचे [समभुल्यभाग] शेअर्स खरेदी करणेसंबंधी.

---

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना सविस्तर माहिती दिली व सदस्यांना कल्पना दिली की, मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांना मोठया प्रमाणात "म्हाडाने" गृहनिर्माणाचे कामे द्यावे म्हणून शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयास अनुसरुन विभागीय मंडळांना प्राधिकरणाने कळविले आहे की, शासन निर्णयास अनुसरुन मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांना कामे द्यावीत आणि शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी.

मा. सभापती यांनी मंडळाच्या सदस्यांना माहिती दिली की, प्राधिकरणाच्या बैठकीच्या वेळी मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांच्याशी चर्चा केली व त्यांना औरंगाबाद मंडळ अंतर्गत गृहनिर्माणाची कामे करणार का असे विचारलेअसतांना त्यांनी छोटी छोटी कामे करण्यास उत्सुकता दर्शविली नाही.

चर्चेच्या ओघात मंडळाच्या सदस्यांचे मत झाले की, मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी हयांना योग्य अशी मोठी कामे देतांना विचारणा करावी कारण छोटीछोटी कामे ते करणार नाहीत.

ठराव क्र. ३०२

---

या विषयावर सर्वकष चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांचा मंडळाचे उद्दिष्टपुर्तीसाठी कसा उपयोग करुन घेता येईल याबाबत सखोल अभ्यास करुन त्यासंबंधीचा अहवाल मंडळाच्या बैठकीसमोर ठेवावा व नंतरच पुढील कार्यवाही करावी.

विषय क्र.३: असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची परिपूर्ती करणेबाबत.

. . . .

या बाब टिप्पणीवर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना माहिती दिली की, या मंडळातील उपअभियंता श्री.जे.जी. पारनाईक यांना हृदयविकाराचा झटका आला होता त्यामुळे त्यांना डॉ. खारकर यांचे दवाखान्यात दि. २४.४.९० रोजी भरती केले होते. श्री. पारनाईक यांना त्यांच्या आजारपणाच्या काळात एकंदर खर्च रु. २७२५.५० झाला व तो प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार मिळावा म्हणून त्यांनी विनंती केलेली आहे. श्री. पारनाईक यांनी सादर केलेली वैद्यकीय बिले, फॉर्म " सी" व फॉर्म "डी" हे जिल्हा शल्य चिकित्सक औरंगाबाद यांचेकडून प्रमाणीत करुन घेतले आहे व त्यांनी रु. २७२५.५० ऐवजी रु. २६८५.५० मंजूर करावे अशी विनंती केली आहे. प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार खर्चाच्या ९०% रक्कम म्हणजे रु. २४१७/- मंजूर करता येते.

ठराव क्र. ३०३

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, श्री. पारनाईक उपअभियंता यांनी त्यांच्या आजारपणाच्या काळात केलेला खर्च व शल्य चिकित्सक औरंगाबाद यांनी रु. २६८५.५० मंजूर करण्याची शिफारस केली होती त्या रक्कमेपैकी ९०% रक्कम म्हणजे रु. २४१७/- हे प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार देय असल्याने अदा करण्यांत यावी.

विषय क्र. ४: विशेष नियोजन प्राधिकरण वाळूज, क्षेत्राच्या प्रसिध्द झालेल्या रचनात्मक आराखडा नकाशाच्या प्रती पुरविणेबाबत.

यावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना माहिती दिली की, वाळूज विशेषनियोजन प्राधिकरण क्षेत्राचा रचनात्मक आराखडा जनतेच्या अवलोकनार्थ व हरकती/सूचना ऐकुण घेण्यासाठी प्रसिध्द करण्यांत आला आहे. सदर आराखडयाच्या नकाशाच्या निलप्रतीची [ BLUE PRINTS ] मागणी ज्यांच्या जमिनी रचनात्मक आराखडयात समाविष्ट

...

केलेल्या आहे. त्यांच्याकडून होणार आहे व सदर नकाशे देणे क्रमप्राप्त आहे. नकाशाची मागणी आल्यास नकाशाच्या आकारानुसार किंमत आकारुन नकाशा देता येईल. नकाशाचे जुने शासकीय दरात वाढ होणे आवश्यक झाल्याने सुधारीत दरास मंडळानी मान्यता द्यावी असा प्रस्ताव असल्याचे उपसभापतींनी सांगितले.

ठराव क्र. ३०४

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने खालील प्रस्तावीत केलेल्या नकाशाच्या आकारानुसार दरास मान्यता दिली.

| अ. क्र. | सर्वसाधारण नकाशाचा आकार | नकाशाचा दर | |
|---|---|---|---|
| | | रंगाशिवाय | रंगीत |
| १. | फुल स्केल आकार ८–$\frac{1}{2}$" x १३–$\frac{1}{2}$" | १२. ०० | २५. ०० |
| २. | १'–०" x १'–६" | २०. ०० | ५०. ०० |
| ३. | १'–६" x २'–०" | ५०. ०० | ७५. ०० |
| ४. | २'–०" x ३'–०" | ७०. ०० | १००. ०० |
| ५. | २'–६" x ३'–६" | १००. ०० | १२५. ०० |

विषय क्र. ५: नंदुरबार जि. धुळे येथील तळोदा रोड, हमालवाडा व लहान माळीवाडा मिळाटी या झोपडपट्टीतील सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. ३०५

नगर परिषद नंदुरबारकडून तळोदारोडहमालवाडा व लहान माळीवाडा भिलाटी या दोन झोपडपट्टीतील सुधारणा कामास प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून अनुक्रमे रु. ९६७२६ व रु. २,०३,१५६ चे प्रस्ताव प्राप्त झाले आहे.

नंदुरबार शहरासाठी ९०–९१ या आर्थिक वर्षात २. १३ लक्षाची तरतुद ठेवण्यात आली आहेत. आतापर्यन्त झोपडपट्टी सुधार कामावर नगरपरिषद नंदुरबारने ०. ७२ लक्ष खर्च केले असून रु. १. ४१ लक्ष शिल्लक आहे व नगरपरिषद नंदुरबारच्या हाती सध्या ०. २८ लक्ष रुपयाची कामे आहेत ही कामे पूर्ण होऊनही संपूर्ण तरतुद खर्च होऊ शकत नाही. त्यामुळे तळोदारोड हमालवाडा व

लहान मालीवाडा भिलाटी या दोन झोपडपट्टी सुधार कामाच्या अंदाजपत्रकास अनुक्रमे रु. ८२,५९३ व रु. १,५१,७०५ एवढया किंमतीच्या खर्चास नगरपरिषदेच्या हाती असलेल्या ०.२८ लक्षाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय

विषय क्र. १: असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची परिपूर्ती करणेबाबत.

ठराव क्र. ३०६

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, श्री. बाभुळगांवकर लेखापाल यांनी त्यांच्या पत्नी सौ. कमल बाभुळगांवकर यांना [SEVERE HAEMERRHAGES ] या रोगावर केलेला खर्च हा प्राधिकरणाच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती मार्गदर्शक तत्वानुसार असल्याने श्री. बाभुळगांवकर यांनी त्यांच्या पत्नीच्या आजारपणासाठी केलेला खर्च प्राधिकरणाच्या नियमानुसार पडताळून व प्रमाणीत करून घेऊन अदा करण्यास मान्यता दिली.

विषय क्र. २: गृहनिर्माण भवन, औरंगाबाद जवळील मध्यम उत्पन्न गटान्तर्गत बांधलेल्या १९२ गाळयापैकी १२ गाळयासाठी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडून आलेल्या मागणीवर निर्णय घेण्याबाबत.

या बाब टिप्पणीवर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना माहिती दिली की, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना औरंगाबाद जिल्हयातील सरकारी कर्मचा-यांच्या निवासासाठी अल्पबचत अनुदानातून निवासी गाळे खरेदी करावयाचे आहेत त्यासाठी त्यांनी औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाच्या कार्यालयाजवळील मध्यम उत्पन्न गटातील १९२ गाळयापैकी, १२ गाळे असलेल्या एका पूर्ण इमारतीची मागणी केली आहे.

यावर श्री. मुन्शीलाल गौतम, आयुक्त मनपा यांनी मुद्दा उपस्थित केला की, सर्वसाधारण जनतेची मागणी असल्यासहे गाळे देता येतील का ?

यावर उपसभापतींनी माहिती दिली की, या योजनेसाठी लोकांकडून सप्टेंबर १९८५ व डिसेंबर १९८५ मध्ये अर्ज मागविले होते. त्यास अनुसरुन अनुक्रमे

१२२ व ५९ अर्ज प्राप्त झाले. अशा एकुण १८१ अर्जांची छाननी करुन सोडत काढण्यांत आली व त्यात १३१ अर्जदार पात्र ठरले. १३१ पैकी २ अर्जदारांनी अनामत रक्कम परत घेतल्या त्यामुळे ६३ गाळे या योजनेत शिल्लक असल्याचे उपसभापतींनी सांगितले. ६३ गाळयापैकी ३ गाळे शासनाच्या ३ २% कोटयातून वाटपासाठी आरक्षीत आहेत. अशा परिस्थितीत म्हाडा [मालमत्ता व्यवस्थापन विक्री, हस्तांतरण आणि गाळयांची अदलाबदल] विनियम १९८१ च्या विनियम ६ [४] अन्वये सर्व साधारण जनतेकडून आलेल्या अर्जदारांना गाळे वाटप करुन उरलेल्या गाळयापैकी संपूर्ण इमारत विकता येते.

यावर मा. विभागीय आयुक्त/नासिक यांनी वरील इमारत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना विकत देण्यांत यावी असे सुचविले.

ठराव क्र. ३०७
-----------

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी, गृहनिर्माण भवनाजवळील, मध्यम उत्पन्न गट १९२ गाळयातील १२ गाळयाची एक इमारत औरंगाबाद जिल्हयातील सरकारी कर्मचारी निवासासाठी अल्प बचत अनुदानातून विकत देण्यासाठी मान्यता देण्यांत येत असून जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना इमारत खरेदीबाबतचे निर्णय, अटी व किंमत वगैरे तपशील कळविण्यांत यावा व पुढील वाटपाची कारवाई करावी.

मंडळाची बैठकसंपल्यानंतर नासिक विभागातील गृहनिर्माणाशी निगडीत असलेल्या प्रश्नासंबंधी विभागीय आयुक्त/नासिक यांच्याशी उपसभापतींनी चर्चा केली व असलेल्या अडचणीसंबंधी माहिती दिली. त्यावर विभागीय आयुक्तांनी सदर प्रकरणी लक्ष घालण्याचे आश्वासन दिले.

मा. श्री. गोखलेसाहेब विभागीय आयुक्त नासिक यांनी मंडळाची ऑक्टो. ९० मध्ये होणारी बैठक नासिक विभागांत ठेवावी असे सुचविले. त्यावर मा. सभापतींनी मंडळाची पुढील बैठक नासिक अथवा जळगांव येथे आयोजित करण्याचे सांगितले.

बैठकीनंतर मा. सभापतींचे आभार मानून सभा संपली.

. . . . .